एतदर्थ हिन्दी परीक्षा मंडळाच्या परीक्षा राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी उत्तीर्ण होण्याबाबत ......

Copy

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय, क्रमांक हिभाप. १९६६-न

सचिवालय, मुंबई-३२ : बी.आर्.

दिनांक १ ऑक्टोबर १९६६

शासन निर्णय, राजकीय आणि सेवा विभाग, क्रमांक इएक्स्आर्. ११५५, दिनांक २ जुलै १९५५ पहावा.

**शासन निर्णय.**––राजकीय आणि सेवा विभाग, क्रमांक इएक्सआर्. ११५५, दिनांक २ जुलै १९५५ च्या शासन निर्णयाद्वारे या राज्यातील चतुर्थ वर्ग शासकीय कर्मचाऱ्यांना एतदर्थ हिंदी परीक्षा मंडळाची बोलभाषा प्रभाण श्रेणी परीक्षा उत्तीर्ण होण्याचा आदेश देण्यात आला आहे. दिनांक १ मे १९६६ पासून या राज्यातील शासन व्यवहार मराठीतून करावयाचा निर्णय घेतल्यानंतर चतुर्थ वर्ग शासकीय कर्मचाऱ्यांना यापुढे वरील बोलभाषा प्रमाण श्रेणी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे काय, हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. यावर विचार करण्यात आल्यानंतर शासनाने आता निर्णय घेतला आहे की, यापुढील बोलभाषा प्रमाण श्रेणी परीक्षा या राज्यातील चतुर्थ वर्ग शासकीय कर्मचाऱ्यांना उत्तीर्ण होण्याची आवश्यकता नाही. राजकीय आणि सेवा विभाग, क्रमांक इएक्सआर्. ११५५, दिनांक २ जुलै १९५५ चा शासन निर्णय, प्रस्तुत चतुर्थ वर्ग शासकीय कर्मचाऱ्यांपुरता रद्द समजण्यात यावा.

OFFICE OF THE COLLECTOR,
RATNAGIRI.
Date 31 OCT 1966
Branch

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वा. ना. पंडित,**

उप-सचिव, महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग.

(शा. म. मु.) पीएडी एच् २२ (२,०००-१०-६६)

[ क्रु. मा. प.